# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

१२

दि. ११/१०/२०२४

NEWS TODAY

ई वार्ता










## ''परिसर स्वच्छतेतून उद्यानविद्या महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी''

दि. ०२ ऑक्टोबर, २०२४ रोजी उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली येथे महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. या निमित्त उद्यानविद्या महाविद्यालयात स्वच्छता मोहिमें अंतर्गत परिसर, प्रक्षेत्र स्वच्छ करण्यात आले. 'स्वच्छता दिना' निमित्त उद्यानविद्या महाविद्यालयातील सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी, आचार्य पदवी विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते. मा. सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रदिप हळदवणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात स्वच्छता अभियानांतर्गत प्रक्षेत्र नर्सरी नं. ४, नर्सरी नं. १० व परिसर स्वच्छ व प्लॅस्टीकमुक्त करण्यात आले. भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान श्री. लाल बहादूर शास्त्री यांचे प्रतिमेस पुष्पहार घालून स्वच्छतेची शपथ सर्व विद्यार्थ्यांनी घेतली व आपला परिसर प्लॅस्टीकमुक्त करण्याबाबत संकल्प केला.

सदर कार्यक्रमाप्रसंगी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठचे आदरणीय कुलगुरू महोदय, डॉ. संजयजी भावे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता दिनानिमित्त मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. पराग हळदणकर आणि संशोधन संचालक डॉ. प्रकाश शिनगारे यांनी स्वच्छता दिनानिमित्त उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.

स्वच्छता दिन यशस्वी होण्यासाठी डॉ. राकेश गजभिये, डॉ. नितेश दळवी, डॉ. योगेश परूळेकर, डॉ. महेश कुळकर्णी, डॉ. सुमेद थोरात, डॉ. योगेश सैतवाल, डॉ. (सौ.) स्नेहा तोरणे, डॉ. आशिष भुवड, डॉ. किरण शिगवण आणि श्रीमती स्मिता पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.





